नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७४ Issue - 174 | वार - शनिवार दि. २१ नोव्हेंबर २०२६ Blow- Saturday Date 21 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

सुप्रीम कोर्टाचा विमा कंपन्यांना दणका! १५ दिवसाच्या आत नाकारलेले २२७ कोटी रुपये देण्याचे निर्देश

धाराशिवमधील शेतकऱ्यांना दिलासा; सर्वोच्च न्यायालयाने धाराशिव जिल्ह्यासाठी दिला ऐतिहासिक निर्णय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. विमा कंपनान्यांनी नाकारलेले २२७ कोटी रुपये देण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. २०२० सालच्या अवकाळी पावसानंतर विमा कंपन्यांनी वेगवेगळी कारण सांगत पैसे देण्यास नकार दिला होता. मात्र आता पुढच्या १५ दिवसांच्या आत हे २२७ कोटी रुपये शेतकऱ्यांसाठी देण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत. या निकालामुळं धाराशिव जिल्ह्यातील साडेतीन लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. हे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विमा कंपन्यांनी नाकारलेले २२७ कोटी रुपये मिळणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देश देखील दिले आहेत. पुढच्या १५ दिवसांच्या आत हे २२७ कोटी रुपये शेतकऱ्यांसाठी देण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत. त्यामुळं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार





ज्ञानराज चौगुले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आज सर्वोच्च न्यायालयाने धाराशिव जिल्ह्यासाठी ऐतिहासिक निर्णय दिला. २०२१ मध्ये केस दाखल केली होती. २०२० साली शेतकऱ्यांनी ७२ तासात पोर्टवलर नोंद केली नव्हती म्हणून पीक विमा नाकारला होता. मी केस दाखल केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आज त्याचा निकाल दिला आणि शेतकऱ्यांना न्याय दिला असल्याचे चौगुले म्हणाले.

याबाबत भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी देखील माहिती दिली आहे. कार्तिक एकादशीच्या मुहूर्तावर पांडुरंगाच्या भक्तांना न्यायदेवतेने न्याय दिला आहे. २०२० मध्ये धाराशिव जिल्ह्यात प्रचंड नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने तत्कालीन राज्य सरकारकडे मागणी केली होती. मात्र विमा कंपनीने पैसे देण्यास टाळाटाळ केली होती. आज सुप्रीम कोर्टाने पूर्ण विषय ऐकून घेत, विमा कंपन्यांचे म्हणणे फेटाळून लावले आहे. आजच्या निकालाने धाराशिव शेतकऱ्यांना २२७ कोटी रुपये रक्कम पीक विमा नुकसान भरपाई मिळणार आहे. पुढील पंधरा दिवसात ही रक्कम मिळणार आहे. दुष्काळात ही मोठी रक्कम मिळाल्याने आधार मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अधिकाऱ्यांनी या प्रक्रियेत मोठी मदत केली. प्रति हेक्टर शेतकऱ्यांना अठरा हजार द्यायचे तेव्हा ठरले होते. मात्र साडे तीन लाख शेतकऱ्यांना दहा अकरा हजार रक्कम मिळाली होती. आता शेतकऱ्यांना प्रति हेक्टर सात हजार रुपये मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर ही रक्कम मिळणार आहे. विमा कंपनी पहिल्यापासून म्हणत होती की, ७२ तासांच्या आत शेतकऱ्यांनी म्हणणे मांडले नाही म्हणून मदत मिळणार नाही मात्र, कंपन्यांनी भेदभाव केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. आधीचा निकाल होता तो ऐतिहासिक निकाल होता, त्यामध्ये पैसे देण्याचे आदेश देण्यात आले होते.

मासिक पाळीमुळे पोलीस भरतीची संधी हुकणार नाही! तरुणींना शारीरिक चाचणीसाठी मुदतवाढ, राज्य सरकारचा महत्त्वाचा निर्णय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



मुंबई : पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणींसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ऐन शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आली म्हणून आता तरुणींची संधी हुकणार नाही. अशा तरुणींना आरोग्य तपासणीनंतर पाच ते सहा दिवसांची मुदतवाढ दिली जाणार आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी ही घोषणा केली आहे. महिनोन्महिने मैदानावर घाम गाळायचा, धावण्याचा सराव करायचा, पोलीस होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीवाचं रान करायचं पण ऐन शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आली आणि पोटात कळा सुरू झाल्या, कंबरदुखी किंवा अशक्तपणामुळे धावता आलं नाही, तर मेहनतीवर पाणी फिरण्याची भीती अनेक मुलींना असते. मात्र, आता अशा तरुणींसाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे.

मासिक पाळीच्या काळात काही तरुणींना तीव्र पोटदुखी, कंबरदुखी, थकवा, अशक्तपणा आणि चक्कर येण्याचा त्रास होतो. अशा परिस्थितीत १०० मीटर आणि ८०० मीटर धावणं, गोळाफेक किंवा लांब उडीसारख्या शारीरिक चाचण्या देताना अडचणी येऊ शकतात. प्रत्येक मुलीला होणारा त्रास वेगवेगळा असतो. पण ऐन परीक्षेच्या दिवशी हा त्रास झाला तर कामगिरीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. मासिक पाळीदरम्यान शरीरात बदल होतात. या काळात धावण्याच्या क्षमतेवर किती परिणाम होतो. अशा वेळी मुलींनी काळजी घ्यावी लागते, असे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अपूर्वा देशपांडे यांनी सांगितले. या सगळ्या गोष्टी ध्यानात घेऊन राज्य सरकारने मासिक पाळीच्या काळात शारीरिक चाचणी आल्यास मुलींना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

महसूल विभागाचा निर्णय; दोन लाखांवरील रोख व्यवहारांची माहिती आता आयकर विभागाला जाणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



मुंबई : जमीन किंवा मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारात दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिल्यास त्याची माहिती आता आयकर विभागाला पाठविली जाणार आहे. यासाठी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या 'आय-सरिता' प्रणालीत बदल करण्यात येणार असून, दस्त नोंदणी करतानाच रोख आणि धनादेशाद्वारे दिलेल्या रकमेची स्वतंत्र नोंद केली जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना याबाबत आवश्यक कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

मालमत्तेच्या व्यवहारात दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिली किंवा स्वीकारली गेल्यास त्याची माहिती आयकर विभागाला देणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने १६ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने तसेच आयकर कायद्यातील तरतुदींनुसार महसूल विभागाने याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचे रोख व्यवहार झालेल्या दस्तांची माहिती दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत आयकर विभागाला पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

माहिती संकलनाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि अचूक करण्यासाठी 'आय-सरिता' प्रणालीत ही सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. दस्त नोंदणीच्या वेळी खरेदीदाराने विक्रेत्याला किती रक्कम रोखीने आणि किती रक्कम धनादेशाद्वारे दिली, याची स्वतंत्र नोंद करता येईल. एका व्यवहारात एकापेक्षा अधिक खरेदीदार किंवा विक्रेते असल्यास प्रत्येक पक्षकाराने दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या रकमेचाही स्वतंत्र तपशील नोंदविता येणार आहे.

दस्त नोंदणीच्या वेळी रोख आणि धनादेशाद्वारे दिलेल्या रकमेची स्वतंत्र नोंद होणार

या नोंदींच्या आधारे दुय्यम निबंधक कार्यालयांकडून दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत आर्थिक व्यवहारांचा एसएफटी (स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन) अहवाल आयकर विभागाला पाठविण्यात येईल. या अहवालात खरेदीदार आणि विक्रेत्याचे नाव, पॅन क्रमांक, व्यवहाराची एकूण रक्कम, रोखीने दिलेली रक्कम, दस्त क्रमांक आणि नोंदणी दिनांक यांचा समावेश असेल.

एसटीच्या सेवेला प्रथम प्राधान्य द्या, मंत्री सरनाईक यांचे आवाहन

कार्तिकी एकादशीनिमित्त एसटीच्या एक हजार बसेस सज्ज

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



मुंबई : २१ नोव्हेंबरला कार्तिकी एकादशी आहे. यानिमित्त पंढरपूरमध्ये मोठ्या संख्येनं वारकरी दाखल होत आहेत. या कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार एसटी महामंडळाने सुमारे १ हजार जादा बसेस सज्ज ठेवल्या आहेत. या माध्यमातून भाविकांना सुरक्षित, आरामदायी आणि विश्वासार्ह प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

चंद्रभागा बसस्थानकातून राज्यातील विविध भागांसाठी जादा बसफेऱ्यांचे नियोजन

आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकी एकादशीलाही वारकरी संप्रदायात विशेष महत्व आहे. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही संबोधले जाते. त्यामुळे या पवित्र पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक पंढरपूरमध्ये दाखल होतात. चंद्रभागेच्या पवित्र तीरावर भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनुपम सोहळा अनुभवायला मिळतो.

भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने पंढरपूर येथील चंद्रभागा बसस्थानकातून राज्यातील विविध भागांसाठी जादा बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे. दर्शनानंतर भाविकांना आपल्या गावी परतण्यासाठीही पुरेशा बसगाड्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. गर्दीचे नियोजन, बसफेऱ्यांचे व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महामंडळाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे.

महिलांना तिकिटाच्या दरात ५० टक्के सवलत

एसटी महामंडळाच्या माध्यमातून अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा, तर ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना तिकिटाच्या दरात ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलतींचा लाभ घेत भाविकांनी खासगी वाहनांऐवजी एसटीच्या सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवाससेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. भक्तीचा प्रवास असो वा परतीची वाट, वारकऱ्यांच्या सेवेसाठी एसटीची लालपरी सदैव सज्ज आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि आनंददायी व्हावा, यासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध आहे,' असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

कार्तिकी एकादशीला लाखो भाविक पंढरपूरमध्ये दाखल होतात

आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकी एकादशीलाही वारकरी संप्रदायात विशेष महत्त्व आहे. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही संबोधले जाते. भगवान विष्णू चार महिन्यांच्या योगनिद्रेतून या दिवशी जागे होतात, अशी धार्मिक श्रद्धा आहे. त्यामुळे या पवित्र पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक पंढरपूरमध्ये दाखल होतात. चंद्रभागेच्या पवित्र तीरावर भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनुपम सोहळा अनुभवायला मिळतो.

महाराष्ट्रात पुन्हा पावसाचे संकेत; हवामान विभागाचा अलर्ट जारी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : 'अकवान' चक्रीवादळामुळे ८ राज्यांमध्ये पुढील चार आठवड्यांत पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे. ओडिशा, पश्चिम बंगाल, दक्षिण भारत आणि महाराष्ट्रातील काही भागांत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, १९ नोव्हेंबर ते १७ डिसेंबर या कालावधीत देशाच्या विविध भागांत पावसाचे चित्र पाहायला मिळू शकते. तर दुसरीकडे उत्तर भारतात थंडीसह दाट धुक्याचे संकट वाढले आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं 'अकवान' हे चक्रीवादळ गुरुवारी रात्री अधिक शक्तिशाली झालं आहे. भारतीय हवामान विभागाच्या (खचऊ) अंदाजानुसार, 'अकवान' हे चक्रीवादळ आज (२० नोव्हेंबर) दुपारी उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनारपट्टीवर म्हणजे गंजाम जिल्ह्यातील गोपाळपूरजवळ धडकण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, 'अकवान' हे चक्रीवादळ पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरातून ताशी १९ किमी वेगाने उत्तर-वायव्यकडे सरकत आहे. गुरुवारी रात्री ११:३० वाजता हे वादळ आंध्र प्रदेशातील कलिंगपट्टणमपासून आग्नेयेकडे १७० किमी आणि विशाखापट्टणमपासून पूर्व-आग्नेयेकडे २०० किमी आणि ओडिशातील गोपाळपूरपासून दक्षिणेकडे २४० किमी अंतरावर होतं. तसेच हे वादळ किनारपट्टीवर धडकताना वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ८० किमी असू शकतो, तर काही ठिकाणी हा वेग ताशी ९० किमीपर्यंत असण्याची शक्यता आहे.

विशाखापट्टणम किनारपट्टीवर २० ते ३० किमी प्रतितास वेगाने वारे वाहत असून समुद्र खवळलेला आहे. विशाखापट्टणमवरील चक्रीवादळाचा धोका टळला असला, तरी आज उत्तर आंध्र प्रदेशमध्ये पावसाची शक्यता आहे.

ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये अकवान चक्रीवादळ आज धडकणार असल्याची माहिती आहे. या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या चक्रीवादळाचा परिणाम आंध्र प्रदेश, ओडिशामध्ये होणार असून तिथे काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे महाराष्ट्रातही काही भागांत पावसाची शक्यता आहे. यासंबंधीचे वृत्त एका मराठी वृत्तसंस्थेने दिले आहे.

पुढील चार आठवड्यांचा अंदाज

१९ ते २६ नोव्हेंबर : ओडिशा आणि गंगा नदीच्या पश्चिम बंगाल खोऱ्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता. झारखंड, आसाम, केरळ व तामिळनाडूत पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

२६ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर : केरळ, तामिळनाडू, दक्षिण कर्नाटकातील काही भाग व आंध्र प्रदेशात पावसाची शक्यता.

३ ते १० डिसेंबर : दक्षिण भारतातील अनेक भागांसह कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात पाऊस पडण्याची शक्यता आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

प्रवाशांना दिलासा

२१ नोव्हेंबरला कार्तिकी एकादशी आहे. यानिमित्त पंढरपूरमध्ये मोठ्या संख्येनं वारकरी दाखल होत आहेत. या कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार एसटी महामंडळाने सुमारे १ हजार जादा बसेस सज्ज ठेवल्या आहेत. या माध्यमातून भाविकांना सुरक्षित, आराम दायी आणि विश्वासार्ह प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकी एकादशीलाही वारकरी संप्रदायात विशेष महत्व आहे. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही संबोधले जाते. त्यामुळे या पवित्र पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक पंढरपूरमध्ये दाखल होतात. चंद्रभागेच्या पवित्र तीरावर भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनुपम सोहळा अनुभवायला मिळतो. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने पंढरपूर येथील चंद्रभागा बसस्थानकातून राज्यातील विविध भागांसाठी जादा बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे. दर्शनानंतर भाविकांना आपल्या गावी परतण्यासाठीही पुरेशा बसगाड्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. गर्दीचे नियोजन, बसफेऱ्यांचे व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महामंडळाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. एसटी महामंडळाच्या माध्यमातून अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा, तर ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना तिकिटाच्या दरात ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलतींचा लाभ घेत भाविकांनी खासगी वाहनांऐवजी एसटीच्या सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवाससेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. भक्तीचा प्रवास असो वा परतीची वाट, वारकऱ्यांच्या सेवेसाठी एसटीची लालपरी सदैव सज्ज आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि आनंददायी व्हावा, यासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध आहे, असे परिवहनमंत्र्यांनी विश्वास व्यक्त केला. आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकी एकादशीलाही वारकरी संप्रदायात विशेष महत्त्व आहे.

थंडीत दवाखान्याची चक्कर टाळायची असेल तर करा तुळशीचा वापर , होतील आश्चर्यकारक फायदे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

तुळशीमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. याचे वर्णन प्राचीन भारतातील ग्रंथांमध्येही आढळते. याआधीही अनेक आजारांवर उपचार केले जात होते आणि आजही शेकडो आजारांमध्ये आयुर्वेद तज्ज्ञ त्याचा वापर करतात.

त्याच वेळी, त्याचे गुणधर्म वेदांमध्ये देखील सांगितले आहेत. तुळशीच्या बियांना सब्जा बियाणे, फालुदा बियाणे आणि तुकमरिया बियाणे अशा अनेक नावांनी ओळखले जाते. यामुळे तुमची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. सर्दी झाली की तुळशीचा आणि लवंगाचा चहा प्यायला पाहिजे असे अनेकदा वडीलधारी मंडळी सांगतात. त्याचप्रमाणे तुळशीमुळे तुम्हाला अनेक आजारांपासून आराम मिळतो. चला जाणून घेऊया त्याचे फायदे.

बद्धकोष्ठतेची समस्या दूर होईल

तुळशीच्या बियांचा वापर करुन पोटाची समस्या देखील दूर होते. कारण ते शरीराला नैसर्गिकरित्या डिटॉक्स करण्यास मदत करते. तसेच पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. याचे नियमित सेवन केल्यास मल पास होणेही सोपे होते. तुळशीच्या बिया नैसर्गिक रेचक म्हणून काम करतात, ज्यामुळे शरीराच्या आतड्याची हालचाल



वाढण्यास मदत होते. कोमट दूध आणि पाण्यासोबत तुळशीचे सेवन केल्यास पचनाच्या समस्यांशिवाय पोट फुगणेही कमी होते.

शुगर रुग्णांसाठी मोठे वरदान

तुळशीच्या बियांचे सेवन शुगरच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर ठरु शकते. कारण त्यात भरपूर फायबर असते. जे रुग्णाच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते. यासाठी तुळशीच्या बिया रात्रभर पाण्यात भिजवाव्या लागतील. त्यानंतर सकाळी एक ग्लास दुधात या बिया टाकून प्या. यामुळे तुम्हाला इन्सुलिनमध्ये सुधारणा दिसून येईल.

वजन कमी करण्यास मदत

जर तुम्ही लठ्ठपणाने त्रस्त असाल तर तुळशीच्या बिया तुमचे वजन कमी करू शकतात. तुळशीमध्ये ओमेगा ३ फॅटी सिड जास्त असते. जे वजन कमी करण्यास मदत करते. याशिवाय त्यात अल्फा-लिनोलेनिक ॲसिड कंपाऊंड देखील आहे. त्यामुळे तुमचे पोट बराच काळ भरलेले राहते.

आमच्याकडे सर्व प्रकारच्या आजारांवर आयुर्वेदिक औषध उपलब्ध आहे तसेच पंचकर्म सुविधा उपलब्ध आहेत

संपर्क....

संजीवनी निसर्गोपचार केंद्र वसंत नगर,वाडी कोरोली आयटीआय कॉलेज समोर पंढरपूर

मोबाईल ९८२२९०८७८७

चारा टंचाई रोखण्यासाठी ऊसतोड मजुरांमार्फत तोडणीचे आवाहन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर / प्रतिनिधी : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि आगामी चारा टंचाई लक्षात घेऊन पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी साखर कारखान्यांना हार्वेस्टरऐवजी ऊसतोड मजुरांमार्फत ऊसतोडणी करण्याचे आवाहन केले होते. मात्र, या आवाहनाला कारखान्यांकडून केवळ एक दिवस प्रतिसाद मिळाला. त्यानंतर पुन्हा हार्वेस्टर मशीनद्वारे ऊसतोडणी जोरात सुरू झाली आहे.

त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश कागदावरच राहिल्याचे चित्र असून, चारा टंचाईच्या संकटात शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जिल्ह्यात यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत अत्यल्प आणि खंडित पाऊस झाल्याने गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या अनुषंगाने विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. आगामी काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने ५ नोव्हेंबर रोजी सर्व साखर कारखान्यांच्या संचालकांना पत्र पाठवून ऊसतोडणीबाबत निर्देश देण्यात आले होते.

हार्वेस्टर मशीनद्वारे ऊसतोडणी केल्यास उसाचे पाचट आणि वरील भागातील हिरवा चारा अर्थात वाडे नष्ट होतात किंवा त्याचा जनावरांसाठी उपयोग करणे शक्य होत नाही. याउलट, ऊसतोड मजुरांमार्फत पारंपरिक पद्धतीने ऊसतोडणी केल्यास मोठ्या प्रमाणात हिरवा चारा आणि पाचट उपलब्ध होऊ शकते. हा चारा ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुपालकांसाठी उपयुक्त ठरू शकतो. त्यामुळे कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतात हार्वेस्टरचा वापर टाळून ऊसतोड मजुरांच्या टोळ्यांमार्फत किंवा कोयता पद्धतीने ऊसतोडणी करावी, असे आवाहन केले होते.

वाढ्याच्या चाऱ्याचे दरही गगनाला

एकीकडे दुष्काळामुळे हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी झाली आहे, तर दुसरीकडे वाड्याच्या चाऱ्याचे दरही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. जनावरांना जगवण्यासाठी शेतकऱ्यांना महागड्या दराने चारा खरेदी करावा लागत आहे. अशा परिस्थितीत हार्वेस्टरद्वारे ऊसतोडणी सुरू राहिल्यास उपलब्ध होऊ शकणारा हिरवा चारा, पाचटही वाया जाण्याची भीती आहे. जनावरांचे पालनपोषण करायचे कसे, असा प्रश्न पशुपालकांसमोर आहे.



अंमलबजावणीवर देखरेख कोणाची?

जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दिल्यानंतर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की नाही, यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ पत्र आणि प्रसिद्धीपत्रक काढून चारा टंचाईचा प्रश्न सुटणार नाही. कारखान्यांनी आदेशांचे पालन केले की नाही, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र, प्रशासनाकडून प्रभावी पाठपुरावा होत नसल्याने दुष्काळी उपाययोजना केवळ कागदावरच राहत असल्याची भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. चारा टंचाईच्या संकटात शेतकरी आणि पशुपालक हवालदिल झाले असताना हार्वेस्टर पुन्हा सुरू झाल्याने जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ग्रामपंचायत बऱ्हाणपूर येथे टिपू सुलतान यांच्या जयंती साजरी



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बऱ्हाणपूर प्रतिनिधी/उत्तम बनसोडे : आज २० नोव्हेंबर सालाबाद प्रमाणे शेर हिंदी शहीद हजरत टिपू सुलतान यांच्या २७६ जयंती निमित्त ब्रहानपूर गावातील ग्रामपंचायत मध्ये फोटो पूजन करण्यात आले फोटो पूजन शहीद मुजावर रहमान फुलारी यांच्या हस्ते करण्यात आला उपस्थितीत इमरान पटेल बिलाल पिरजादे मझहर खादिम तनवीर पिरजादे सरफराज फुलारी इरफान मकानदार इकराम शेख दीपक इरवाडकर गौस नदाफ शहबाज पीरजादे दिलदार मुजावर गौस शेख नासिर पिरजादे महंमद पीरजादे प्रकाश बनसोडे अंजना इरवाडकर रहमान भाई पीरजादे (दादा सोशल फाउंडेशन बुऱ्हानपूर संस्थापक अध्यक्ष) यांनी सगळ्यांचा आभार मानला.

नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी पडघ्यात 'नागरी दक्षता मंचाची स्थापना



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नागरी समस्यांवर संघटितपणे आवाज उठवण्यासाठी स्थानिक तरुणांनी पुढाकार घेतला आहे. नागरिकांच्या प्रश्नांना योग्य न्याय मिळावे आणि संबंधित प्रशासनाकडून समस्यांची दखल घेतली जावी, या उद्देशाने पडघा येथे 'नागरी दक्षता मंचा'ची स्थापना करण्यात आली.

दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर पडघा बाजारपेठेतील नाखवा परिसरात या मंचाची स्थापना करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ नागरिक राजू सालसकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर मंचाचे अध्यक्ष अविनाश महाजन यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून मंचाचे उद्घाटन करण्यात आले. पडघा परिसरातील पाणी, रस्ते, स्वच्छता तसेच इतर सार्वजनिक सुविधांशी संबंधित अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. या समस्यांबाबत नागरिकांनी वेळोवेळी संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा केला; मात्र अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या समस्या एकत्रितपणे प्रशासनासमोर मांडून त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी

गावातील विविध समस्या मार्गी लावण्यासाठी घेणार पुढाकार

मंचाची स्थापना करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमातून पडघा परिसरातील नागरी प्रश्नांना प्राधान्य देऊन शासन व प्रशासनाच्या विविध विभागांकडे पाठपुरावा केला जाणार आहे. तसेच नागरिकांच्या हक्कांसाठी आणि परिसराच्या विकासासाठी मंच कार्यरत राहणार असल्याची भूमिका उपस्थितांनी व्यक्त केली.

याप्रसंगी मंचाचे उपाध्यक्ष भानुदास तांबोळी, शंशाक तांबोळी, जिल्हा परिषद पारसिक सहकारी बँकेचे संचालक पंडित पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच सचिव योगेश जाधव, संतोष तेलवणे, मयुरेश गंधे, संतोष सपाट, किरण तेलवणे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांच्या पुढाकारातून परभणीत लोकशाही पत्रकार महासंघाचा राज्यस्तरीय मेळावा उत्साहात संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

परभणी/प्रतिनिधी : लोकशाही पत्रकार महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. किशोर दादा पवार यांच्या पुढाकारातून परभणी येथे राज्यस्तरीय सहविचार बैठक, पत्रकार प्रशिक्षण मेळावा व पदाधिकारी नियुक्ती समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पत्रकारांचे हक्क, संरक्षण, सुरक्षा, सन्मान, आर्थिक स्वावलंबन आणि संघटनात्मक बळकटीकरण या महत्त्वपूर्ण विषयांवर यावेळी सविस्तर विचारमंथन करण्यात आले.





या मेळाव्यात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांनी पत्रकारांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा मुद्दा ठामपणे मांडला. पत्रकारांनी समाजाचा आवाज बनण्यासोबतच आर्थिकदृष्ट्याही सक्षम आणि स्वावलंबी झाले पाहिजे. त्यांना योग्य मोबदला, आर्थिक स्थैर्य आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. पत्रकारांना सक्षम करण्यासाठी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन, अशी ग्वाही त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून दिली. राज्यातील पत्रकारांचे प्रश्न शासन-प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यांच्या हक्कांसाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदिप जाधव, राष्ट्रीय संघटनमंत्री ज्ञानेश्वर बुधवत, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रतापराव साळुंखे, राष्ट्रीय सरचिटणीस हलिमा शेख, राष्ट्रीय महासचिव आयेशा मुलानी, डिजिटल मीडिया अध्यक्ष महेबूब शेख, राज्य महासचिव चंद्रशेखर बनसोडे आणि राज्य संघटक रहीम खान यांच्यासह विविध विभागांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पत्रकारांचे अधिकार व कर्तव्ये, झुम्झ कायद्यामुळे शोध पत्रकारितेसमोरील आव्हाने, डिजिटल मीडियातील बदलते प्रवाह, पत्रकार प्रशिक्षण, शासकीय योजना आणि पत्रकारांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

मेळाव्यादरम्यान विविध राज्य, विभाग व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये ॲड. भारती आमले, पुलकेश कांबळे, सागर दनोरीकर, भीमराव हैबते, फारुख बेग, सुशील गायकवाड, किरण सदावर्ते, भाऊराव सावणे, मोहम्मद नाझिम सिद्दिकी, फरहाना शेख मोहम्मद इस्माईल, डॉ. सतीश भदाणे आणि जितेंद्र शिंदे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे आयोजन डिजिटल मीडिया अध्यक्ष महेबूब शेख, राज्य संघटक रहीम खान आणि डिजिटल मीडिया उपाध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले होते.

पत्रकारांचे हक्क, सन्मान, संरक्षण आणि आर्थिक स्वावलंबन यासाठी संघटितपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर महासंघाचे संघटन अधिक व्यापक करण्याचा निर्धार या मेळाव्यात करण्यात आला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

राज्यातील प्रदूषण कमी करण्यात प्रदूषण नियंत्रण मंडळाची भूमिका महत्त्वाची : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

भावी पिढ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पर्यावरण संवर्धनात सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा; पर्यावरणपूरक विकासासाठी शासन कटिबद्ध

■ प्रत्येक वारी प्रदूषणमुक्त, निर्मल व स्वच्छ करण्याचा संकल्प करूया

■ दर्शन रांगेच्या कामासाठी अतिरिक्त २५ कोटीचा निधी मंजूर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राज्यभर प्रदूषण नियंत्रणासाठी महत्त्वपूर्ण काम करत असून, प्रदूषण कमी करण्यासाठी मंडळाची भूमिका मोलाची आहे. सर्वसामान्य नागरिक आणि भाविक वारकऱ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी मंडळाच्या वतीने अनेक वर्षांपासून 'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आयोजित 'कार्तिकीची वारी, पंढरीच्या दारी' या कार्यक्रमात



ते बोलत होते. यावेळी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, माजी आमदार शहाजी पाटील, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, कार्यकारी अभियंता अमित निमकर, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीचा संदेश गावोगावी पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. व्हॅनच्या माध्यमातून जनजागृती, प्लास्टिक बंदीसारखे निर्णय आणि प्रदूषण करणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. भावी पिढ्यांचे उज्ज्वल भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण केल्यास पर्यावरणपूरक समाज घडण्यास मदत होईल. वृक्षलागवड मोठ्या प्रमाणात करण्यासाठीही सर्वांनी पुढाकार घ्यावा.

आपल्या संतांनी अभंग आणि विचारांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, निसर्गचक्र आणि जलसंवर्धनाचे महत्त्व समाजाला पटवून दिले आहे. त्याच धर्तीवर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून गोंधळ, पोवाडे आदी लोककलेद्वारे जनजागृती केली जात आहे. राज्यातील ३१० तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर झाली असून, पर्यावरणाचे योग्य संवर्धन केल्यास निसर्गचक्र टिकून राहील आणि मानवाचे भविष्य उज्ज्वल होईल, असेही त्यांनी सांगितले.

आषाढी व कार्तिकी वारीदरम्यान पंढरपूर येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. या भाविकांना शौचालये, स्वच्छता, पिण्याचे पाणी तसेच दर्शन रांगेतील आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कार्यरत आहे. प्रत्येक वारी पर्यावरणपूरक, निर्मल व स्वच्छ असावी, वारकऱ्यांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात आणि ते समाधानी होऊन परतावेत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रदूषण नियंत्रणाच्या कामात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत असून, तरुण पिढीचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून राज्यातील दीड लाखांहून अधिक उद्योगांच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी काम केले जात असल्याचे मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी सांगितले. राज्याला सुजलाम्-सुफलाम् करण्यासाठी पर्यावरण संवर्धन महत्त्वाचे असून, प्रदूषण नियंत्रणाच्या कार्यात सर्वांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले.

मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांनी राज्यभर प्रदूषण नियंत्रणासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. प्लास्टिकचा वापर टाळून निसर्गाशी नाते अधिक घट्ट करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे ते म्हणाले.

'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' या कार्यक्रमांतर्गत शाहीर प्रशांत जाधव, श्रीकांत रेणके, अनिल केदार, शैलाताई खांडगे आणि संजय कानडे यांनी लोककलेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे जनसंपर्क अधिकारी संजय भुस्कुटे यांनी केले.

जिल्हाधिकारी व प्रशासनाच्या कामाचे कौतुक

ख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १९ नोव्हेंबर रोजी कार्तिकी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर शहरात भाविकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी रस्ते दुरुस्ती, ६५ एकर परिसरात वारकऱ्यांसाठी कार्पेट व्यवस्था आणि अन्य सुविधांबाबत सूचना केल्या होत्या. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन आणि प्रशासनाने या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करून दुसऱ्याच दिवशी सुविधा उपलब्ध केल्याबद्दल त्यांनी प्रशासनाच्या कामाचे कौतुक केले. तसेच दर्शन रांगेच्या कामासाठी व सुविधा निर्माण करण्यासाठी कमी पडत असलेल्या अतिरिक्त २५ कोटी निधीलाही मंजुरी दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कार्तिकी वारीसाठी आलेल्या सर्व वारकरी आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपमुख्यमंत्री आणि उपस्थितांनी टाळ-मृदंगाच्या गजरात 'ज्ञानोबा-तुकोबा'चा जयघोष करत पावली केली.

विद्यार्थ्यांनी बुद्धिमत्तेच्या जोरावर स्पर्धा परीक्षेत यश मिळवावे : प्रा. डॉ. संगमेश्वर नीला

कल्याणशेट्टी महाविद्यालयात प्रबोधनपर व्याख्यान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचे ज्ञान, बुद्धिमत्ता, निर्णय क्षमता आणि व्यक्तिमत्त्वाची कसोटी पाहणारी मूल्यमापन परीक्षा असून त्यासाठी वेळेचे व्यवस्थापन, सकारात्मक दृष्टिकोन आत्मविश्वास, आणि संयम असल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेत निश्चित यश मिळते. असे प्रतिपादन वालचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ संगमेश्वर नीला यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते.समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी अध्यक्षस्थानी होते, यावेळी अडव्होकेट सम्राज्ञी नीला, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने उपजिल्हाधिकारी पासून ते राज्य पोलीस, कर सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक व लिपिक तर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, भारतीय परराष्ट्र सेवा, भारतीय वन सेवा अशा भरती परीक्षा घेतल्या जातात.

या परीक्षांमध्ये यश संपादन करण्यासाठी सामान्य अध्ययन, भारतीय राज्यघटना, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, विज्ञान, चालू घडामोडी, गणित आणि बुद्धिमत्ता चाचणी या विषयांचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते. याशिवाय प्रश्नपत्रिकांचा सराव, सराव परीक्षा, वृत्तपत्रांचे नियमित वाचन आणि संदर्भ पुस्तकांचा अभ्यास महत्त्वाचा असतो.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस. आर.लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ.शितल झिंगाडे भस्मे यांनी केले. तर, आभार प्रा.सौरभ भस्मे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापिका मनीषा शिंदे, सौंदर्या शास्त्री, ऐश्वर्या तारापुरे, जनाबाई चौधरी, प्राची गणेचारी उपस्थित होते.

बालभारती विश्वकोशाचे वाचन करा

स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्यासाठी एनसीईआरटी, बालभारती, सीसीआरटी, योजना, कुरुक्षेत्र, द हिंदू, लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, विश्वकोश, इनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका आदीचे वाचन आवश्यक असते. असे प्रोफेसर डॉ. नीला यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

स्पर्धा परीक्षा देऊन विद्यार्थ्यांनी अधिकारी व्हावे

महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधा उपलब्ध केले आहे, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन राज्य व केंद्र सरकारच्या सेवेत अधिकारी व्हावे असे प्रतिपादन समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले.

कार्तिक एकादशी सोहळा निमित्त महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे परिवारांच्या हस्ते महापूजा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणीच्या जयघोषाने अवघी पंढरी दुमदुमली भक्तिमय झाले असून कार्तिक एकादशीचा मुख्य सोहळा उद्या दिनांक २१ नोव्हेंबर शनिवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या सोहळ्यानिमित्त महाराष्ट्र राज्याची उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते सह पत्नी पहाटे दोन वाजता श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे. मुख्यमंत्री असताना त्यांनी आषाढी एकादशी शासकीय महापूजा दोन वेळा केली होती, कार्तिक यात्रेची महापूजा करण्याची ही दुसरे वर्ष आहे. जिल्हा प्रशासन पोलीस, नगरपालिका आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सज्ज झाली आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शुक्रवार दिनांक २० रोजी तीन वाजता पंढरपूर येथे आगमन होणार आहे. त्यानंतर ती पर्यावरण दिंडीच्या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत. गुरुवारी त्यांनी कार्तिक यात्रेची पाहणी करून प्रशासनाने केलेल्या नियोजनाचा आढावा घेतला.

कार्तिके एकादशी सोहळ्यासाठी राज्यातून विभातून वारकरी आणि भावी मोठ्या संख्येत सुमारे चार ते पाच लाख दाखल झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. भाविकांची वाढती गर्दी पाहून जिल्हा प्रशासनाने ६५ या परिसरात दूध सुविधा उपलब्ध करून दिले आहेत.

या ठिकाणी स्वच्छतागृहे व पिण्याची पाण्याची व्यवस्था भाविकांसाठी सुमारे ७२५ खुल्या जागा वैद्यकीय सुविधा, यश वितरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. चंद्रभागा वाळवंटात पाणी व स्वच्छता विषयक आरोग्य विषयक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. समितीकडून १५ अतिरिक्त दर्शन मंडप करण्यासाठी व भाविकांना दर्शन सुलभ होण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून १५ अतिरिक्त दर्शन मार्गाची व्यवस्था करण्यात आली आहे. पिण्याचे पाणी व आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये तसेच गर्दीची योग्य नियोजन व्हावे यासाठी, मंदिर समितीकडून आवश्यक खबरदारी घेण्यात आली आहे. तीन दिवस भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून २० ,२१, २२, या तीन दिवसात मधील समितीच्या वतीने अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. याशिवाय चहा व पिण्याची पाणी किंवा अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे.

२० वर्षांनंतर पुन्हा एकदा शाळेच्या अंगणात भरला आठवणींचा सोहळा

मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट येथे २००६ च्या बॅचतर्फे 'स्मृती सौरभम्' स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/अक्कलकोट : शाळा तीच... वर्ग तेच... मैदान तेच... फक्त काळ पुढे सरकला, विद्यार्थी मोठे झाले आणि आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटांवर विखुरले गेले. मात्र मनाच्या एका कोपऱ्यात जपलेल्या शाळेच्या आठवणी, मित्रमैत्रिणींची मैत्री आणि गुरुजनांविषयीचा आदर आजही तसाच कायम आहे. याच आठवणींना उजाळा देत, जुन्या स्नेहबंधांना पुन्हा घट्ट करत आणि गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट येथे २००६ च्या बॅचतर्फे 'स्मृती सौरभम्' या स्नेहमेळावा उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यात शाळेतील त्या सोनेरी दिवसांच्या आठवणींना पुन्हा उजाळा देण्यात आला. शाळा, मैत्री, आठवणी आणि कृतज्ञतेचा अनोखा सोहळा पार पडला.अनेक वर्षांनंतर शाळेच्या अंगणात एकत्र आलेले विद्यार्थी, एकमेकांना भेटल्यानंतर चेहऱ्यावर उमटलेला आनंद, जुन्या आठवणी सांगताना डोळ्यांत तरळलेले भाव आणि गुरुजनांचे आशीर्वाद घेताना मनात दाटून आलेली कृतज्ञता, अशा अनेक भावनिक क्षणांनी हा दिवस अविस्मरणीय ठरला. जणू काही पुन्हा एकदा शाळा भरली होती आणि बालपण काही तासांसाठी पुन्हा जगायला मिळाले होते.सर्व गुरुजनांचा उपस्थित विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांना फेटा, भेटवस्तू, पुस्तके आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. ज्या शिक्षकांनी आयुष्याला आकार दिला, ज्ञानाची शिदोरी दिली आणि योग्य-अयोग्याची जाणीव करून दिली, त्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा क्षण उपस्थितांसाठी विशेष भावनिक ठरला.

शेवटी एकच भावना... शाळेचे ऋण कधीच विसरता कामा नये!

आपण आयुष्यात कितीही मोठे झालो, कितीही यश मिळवले, तरी आपल्या यशाची पहिली पायरी शाळेतच घातली गेली, हे विसरता कामा नये. शाळा आपल्याला केवळ शिक्षण देत नाही, तर जगण्याची दिशा, माणुसकीचे संस्कार आणि नात्यांची श्रीमंती देते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या शाळेतील मित्रमैत्रिणींना भेटावे, गुरुजनांचा सन्मान करावा, शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी आणि शक्य असेल ते योगदान द्यावे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील दिवंगत गुरुजन आणि दिवंगत मित्रमंडळींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेच्या विद्यमान मुख्याध्यापक योगेश कबाडे यांच्या सह चाचा बिराजदार, बाबासाहेब निंबाळकर, एम एन. मणियार, एस. सी.मुजावर, आर . एस पडवलकर, एस. एन टिंगरे, स्वामी मॅडम, ए.के.खजूर्गीकर, बी.एल सुतार, यांनी आपल्या मनोगतातून जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आनंद व्यक्त करत त्यांना पुढील आयुष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

वय विसरून झाले शाळकरी सर्व विद्यार्थी वय विसरून शाळकरी वयात जाऊन खाली बसून डब्बा खाल्ला, दंगा मस्ती केली, शिक्षकांचा मार खाल्ला, कवायत केली आणि मनसोक्त खेळ खेळले.

श्रुती घिवारे – शाळा सोडल्याला दोन दशके उलटली तरी शाळेने दिलेली शिकवण, संस्कार आणि मार्गदर्शन आमच्या पाठीशी सदैव राहिले आहे. आज आम्ही जीवनात जिथे कुठे आहोत, त्यामागे शाळेचीच पुण्याई आहे.

यावेळी बोलताना मुख्याध्यापक योगेश कबाडे म्हणाले तुम्ही सगळे चांगल्या स्थितीत आहात ही चांगली गोष्ट आहे. पण आपला एखादा वर्ग मित्र संकटात असेल तर त्याच्या मदतीला धावून जाणे, मित्रत्वाचे नाते केवळ भेटीगाठींपुरते मर्यादित न ठेवता ते कृतीतून जपणे आवश्यक आहे. त्यासाठी गरज पडल्यास शाळा आणि शिक्षक त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील असे सांगितले.

आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी समाजातील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीचा हात द्यावा, त्यांचा शैक्षणिक खर्च उचलावा, असे आवाहन बाबासाहेब निंबाळकर त्यांनी केले. माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

या मेळाव्याचे नियोजन दोन टप्प्यांत करण्यात आले होते. प्रत्येक माजी विद्यार्थ्याची वैयक्तिक आठवण करून देण्यात आली. शाळेतील जुन्या आठवणी, परीक्षेतील काम गिरी, सध्याचा व्यवसाय, कौटुंबिक माहिती आणि आयुष्यातील वाटचाल याविषयी माहिती सांगण्यात आली. त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्याचा प्रवास ऐकण्याची आणि एकमेकांना नव्याने जाणून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात मराठा मंदिर गीताने व बँडच्या तालावर मानवंदना देऊन करण्यात आली. नंतर सामुहिक



कवायत केले.सकाळी अकरा वाजता सुरू झालेला हा स्नेहसोहळा सायंकाळी सात वाजेपर्यंत रंगला.

विशेष बाब म्हणजे दहावीच्या अ, ब, क ड आणि ई अशा सर्व तुकड्यांतील विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला होता. प्रत्येक विद्यार्थ्याला स्मृतिगंध सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. गुरुजनांचा सन्मान, मित्रमैत्रिणींच्या भेटी, जुन्या आठवणी, मनोरंजक खेळ, हसत-खेळत रंगलेल्या गप्पा आणि भविष्यातही एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा निर्धार अशा वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.या स्नेहमेळाव्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशालेतील विद्यार्थांसाठी ए आय लॅब साठी च्या उभारण्याचा संकल्प बोलून दाखवला.प्रतिक मेहता, श्रुती घिवारे, आनंद जाजू, देविदास गवंडी, गणेश क्षीरसागर, भाग्यश्री संगोळगी, मेघा खुने, कौस्तुभ पुजारी, वर्षा पंडित, वैशाली तेली, रोहित माढेकर , वंदना देशपांडे , अदिती तोतला , यशोधन मचाले आदीसह सुमारे शंभर हून अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

पुन्हा भरले वर्ग – बाबासाहेब निंबाळकर यांच्या इतिहासाच्या पानात, खजुर्गीकर सर यांच्या जीवनाच्या सारात तर पडवलकर सर यांच्या इंग्रजी तासात रमले.

परिचारिका म्हणतात इंजेक्शन नाही तर डॉक्टरांच्या मते उपलब्ध आहे

दुधनी प्राथमिक आरोग्य केंद्राचा अजब कारभार ऐरणीवर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दुधनी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीज (कुत्रा चावल्याचे) प्रतिबंधक इंजेक्शन उपलब्ध नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. रुग्णाला उपचारापासून वंचित ठेवणाऱ्या आणि परस्परविरोधी उत्तरे देणाऱ्या या अजब कारभाराम ुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

दुधनी येथील रहिवासी चन्नप्पा होसुर यांच्या पाळीव कुत्र्याने खरचटल्यामुळे. पुढील संभाव्य धोका टाळण्यासाठी ते तातडीने दुधनी येथील जिल्हा परिषद आरोग्य केंद्रात उपचारासाठी गेले. तेथील परिचारिका (सिस्टर) एम. एस. बोधले यांना सर्व प्रकार सांगितल्यानंतर त्यांनी आरोग्य केंद्रात रेबीजचे इंजेक्शन उपलब्ध नाही, असे सांगून चन्नप्पा होसुर यांना परत पाठवले.

या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या नागरिकाने तातडीने दुधनी चे नगरसेवक बसराज हौदे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून घडलेली हकीकत सांगितली. नगरसेवकांनी तात्काळ



डॉक्टर विभुते यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली असता, आरोग्य केंद्रात रेबीजचे इंजेक्शन उपलब्ध असल्याची माहिती समोर आली. यामुळे आरोग्य केंद्रात नेमका कोणाचा चालतो कारभार ? नागरिकांच्या जिवाशी असा खेळ का खेळला जातो? असा संतप्त सवाल उप- स्थित होत आहे.

याप्रकरणी तालुका आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सदस्य शिवराज म्हेत्रे आणि पंचायत समिती सदस्य संगीता पाटील यांना अधिकृत पत्र देऊन दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची म ागणी करण्यात आली आहे.

कठोर कारवाई करावी

आरोग्य केंद्रात जीव वाचवणारे इंजेक्शन उपलब्ध असतानाही, खोटी माहिती देऊन रुग्णाला परत पाठवणाऱ्या संबंधित परिचारिका बोधले यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करावी,

– संगीत शिवानंद पाटील
(सदस्य पंचायत समिती अक्कलकोट)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार दिंडी सोहळ्यांना कार्पेटचे वाटप



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी वारी २०२६ च्या अनुषंगाने वारकरी भाविकांसाठी करण्यात आलेल्या नियोजनाचा व सुविधांचा आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील विविध ठिकाणी पाहणी केली. यावेळी त्यांनी भक्तीसागर ६५ एकर परिसरातील दिंडी सोहळ्यांच्या निवास व्यवस्थेची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान ज्या दिंडी सोहळ्यांना कार्पेट उप- लब्ध नाही, अशा दिंडी सोहळ्यांना तातडीने कार्पेट उपलब्ध करून देण्याच्या सूचना

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते कार्पेट उपलब्ध; वारकऱ्यांना दिलासा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना दिल्या होत्या.

त्यानुसार जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते आज कार्पेट उपलब्ध नसलेल्या दिंडी सोहळ्यांना कार्पेट वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. यामुळे भक्तीसागर ६५ एकर परिसरात वास्तव्यास असलेल्या वारकरी भाविकांना दिलासा मिळाला आहे.

य ा व े ळ ी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आदी उपस्थित होते.

वीरपत्नींचा सन्मानासह संविधान दिनाचे औचित्य साधून मेरा बुद्रुक येथे २६ नोव्हेंबरला वाढदिवसानिमित्त भव्य मोफत आरोग्य तपासणी व औषधी वाटप शिबीराचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कैलास आंधळे / चिखली तालुका प्रतिनिधी : सामाजिक बांधिलकी, संविधानाला वंदन आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांच्या कुटुंबीयांचा सन्मान या त्रिसूत्रीचा संगम साधत प्रा. डॉ. सौ. सुवर्णा पुरुषोत्तम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी मेरा बुद्रुक येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधी वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतः पुरता मर्यादित न ठेवता समाजहितासाठी आणि आरोग्यसेवेसाठी समर्पित करण्याच्या उदात्त हेतूने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, मेरा बुद्रुक येथे सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत हे शिबीर पार पडणार आहे.

वीरपत्नींचा गौरव

२६ नोव्हेंबर हा २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील वेदनादायी स्मृतींचा दिवस आहे. देशाच्या रक्षणासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर जवानांच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी या शिबिराचे उद्घाटन जिल्ह्यातील शेलसुर येथील शहीद जवान हरिदास कापसे यांच्या वीरपत्नी श्रीमती कृपालीताई कापसे यांच्या हस्ते करून त्यांच्या कुटुंबीयांच्या बलिदानाप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाणार आहे.

संविधान दिनाचा संदेश

२६ नोव्हेंबर हा 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. भारतीय संविधानाने दिलेल्या समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांचा सन्मान राखत समाजातील प्रत्येक घटकाला उत्तम आरोग्य व गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याची संधी मिळावी, ही या उपक्रमामागील संकल्पना आहे.

तज्ज्ञ डॉक्टरांची नि:शुल्क सेवा

या शिबिरात विविध क्षेत्रांतील म ान्यवर व तज्ज्ञ डॉक्टरांची मोफत सेवा नागरिकांना उपलब्ध होणार आहे.

मान्यवरांची उपस्थिती व संयोजन

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. विनायक दिनकराव पाटील (माजी सभापती, शिक्षण व बांधकाम, जि. प. बुलढाणा) हे राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. डॉ. राजेंद्रजी शिंगणे (माजी आरोग्य मंत्री, महाराष्ट्र तथा अध्यक्ष, बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक), मा. सौ. श्वेताताई महाले पाटील (आमदार, चिखली विधानसभा) आणि मा. डॉ. शशिकांत खेडेकर (म ाजी आमदार, मातृतीर्थ सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघ) यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच प्रमुख उपस्थितीम ध्ये श्री. विष्णू सोनुने आणि श्री. निरज काकडे उपस्थित राहणार आहेत.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.अमोल अनंतराव पडघान (तालुका कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चिखली / माजी सदस्य, पंचायत समिती चिखली) यांच्यासह विविध मान्यवर स्वागतोत्सुक व आयोजक परिश्रम घेत आहेत. नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी, मोफत औषधी वाटप व म ार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पुरंदर तालुक्यातील पांगारे येथे ४७ वर्षीय शिक्षिकेचा निर्घृण खून

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर तालुक्यातील पांगारे येथे पैशांच्या आर्थिक वादातुन ४७ वर्षीय म हिलेचा लोखंडी रॉड व विटेने हल्ला करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना गुरुवारी



सासवड पोलीस येथे दीराविरुद्ध खुनाचा गुन्हा

(दि. १९) सकाळी सुमारे ८.४० वाजण्याच्या सुमारास घडली. उज्वला रामदास काकडे (वय ४७) असे खून झालेल्या मृत शिक्षकेचे नाव आहे त्या हडपसर येथील साधना विद्यालयात कार्यरत होत्या.या प्रकरणी महिलेचा दीर शशिकांत माणिकराव काकडे याच्याविरुद्ध सासवड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सासू सुलोचना माणिकराव काकडे यांनी आरोपीला पाठबळ दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या घटनेबाबत मृत महिलेचे भाऊ गणेश दत्तात्रय मेमाणे (वय ३९, रा. श्रीलक्ष्मी एन्क्लेव्ह सोसायटी, हडपसर, पुणे) यांनी सासवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, महिलेच्या पतीने घेतलेले पैसे, चेक, सोन्याचे दागिने तसेच महत्त्वाची कागदपत्रे परत मागण्याच्या कारणावरून कुटुंबात वाद निर्माण झाला होता. या आर्थिक व्यवहारातून निर्माण झालेला वाद पुढे विकोपाला गेल्याचा आरोप आहे. याच वादातून आरोपी शशिकांत काकडे याने उज्वला काकडे यांच्यावर लोखंडी रॉड व विटेने डोक्यात वार करून त्यांचा खून केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या घटनेत सासू सुल- ोचना काकडे यांनी आर- ोपीला पाठबळ दिल्याचाही आरोप फिर्यादीने केला आहे. पैशांच्या वादा- तून घरातीलच नात्यातील व्यक्तीकडून महिलेचा जीव घेतला गेल्याने पांगारे परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५८२/२०२६ प्रमाणे गुन्हा दाखल

श्रावण बाळ योजनेचे मंजूर अनुदान मिळावे म्हणून सतत दोन वर्ष तुळजापूर तहसील कचेरीला खंडोबाची वारी



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के.गायकवाड : नळदुर्ग तालुका तुळजापूर येथील श्री खंडोबा देवाच्या नावावर वारी मागून आपली पोटाची खळगी भरणारा एक वृद्ध श्रावण बाळ योजनेतील मंजूर मानधन मिळावे म्हणून गेल्या अनेक दिवसापासून तुळजा- पूर तहसिल कार्यालयाकडे चकरा मारत आहे.परंतु गेली दोन वर्षे झाले त्याना अजून सदर योजनेतील मानधन मिळण्याची व्यवस्था संबधित कार्यालयाकडून झाले- ली नाही म्हणून खंडोबाची वारी तहसील कचेरीच्या दारी असं म्हटल्याप्रमाणे तो सतत तहसील कार्यालयाकडे चकरा मारत आहे.

या बाबत वृत्त असे की नळदुर्ग ता.तुळजापूर येथील वृद्ध महादेव शंकर बनसोडे हे येथील ग्रामदैवत श्री खंडोबा देवाच्या नावावर दररोज वारी मागून (भीक मागून) आपली उपजीविका करतात. त्यांनी सन २०२४ मध्ये शासनाच्या श्रावण बाळ वृद्धापकाळ अनुदान योजनेसाठी अर्ज केला होता. सदर त्यांच्या अर्जास ऑगस्ट २०२४ मध्ये रीतसर मंजुरी मिळाली परंतु या लाभार्थ्याला ना मंजुरी आदेश मिळाला ना आतापर्यंत एकही महिन्याचे मानधन मिळाले नाही. जेंव्हा त्यांच्या लक्षात आले की ऑगस्ट २०२४ मध्ये आपल्या अर्जाला मंजुरी मिळाली आहे.तेव्हा पासून म्हणजे सन २०२५ पासून ते संबंधित तहसील कार्यालयाच्या संगायो विभागात सतत चकरा मारून पुढील कार्यवाही संबंधित लागणारे कागदपत्रे वारंवार

अद्याप एक महिन्याचेही अनुदान मिळाले नाही, तुळजापूर तहसील कर्मचाऱ्यांचा की शासनाचा सावळा गोंधळ लाभार्थी मात्र हतबल

देऊन ही त्यांच्या मानधनासाठीची पुढील कारवाई संबंधित कार्यालयाकडून झालेली नाही. अनेक वेळा साईट चालत नाही डेबिट बंद आहे किंवा लाईट गेलेली आहे उद्या या परवा या असे कारणे सांगून त्या बिचाऱ्याला वारंवार तहसील कार्यालयाला चकरा मारण्यास सांगीतले जात असल्याची खंत त्यानी व्यक्त केली आहे. आज ना उद्या आपल्याला मानधन चालू होईल आपल्याला पगार मिळेल या आशेने तह- सील कडे चकरा मारत आहे.

दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी वृद्ध महादेव बनसोडे कागदपत्र घेऊन गेले असता दिवसभर त्याला थांबवून ठेवण्यात आले त्याच्या मागून पुढून येणाऱ्यांच्या फायली चेक करण्याचे त्यांच्या त्रुटी दुरुस्त करण्याचे काम संबंधित कर्मचारी करत होते कारण ते लाभार्थी त्यांच्या एजंटामार्फत आलेले होते. परंतु या विचाराकडे कोणीच लक्ष द्यायला तयार नव्हते. शेवटी त्यांनी हतबल होऊन विचारले की साहेब माझं अर्ज बघा तेंव्हा साहेबांनी सांगितलं अजून साईट चालू झालेली नाही उद्या या,त्या दिवशी त्याची वारी बुडाली भिक मागता मागता काहीतरी पोटाला मिळणाल असत ते ही मिळाले नाही आणि काम ही झाले नाही नाराजी होऊन तो उपासपोटी तहसील कार्यालया पुढे उभा होता.असे किती दिवस चालणार आणि त्या लाभार्थ्याला कधी त्याच्या हक्काची श्रावण बाळ वृद्धापकाळ योजनेतील पगार मिळणार ? असा प्रश्न त्याच्या केविलवाण्या चेहऱ्यावर पडलेला दिसून आला. शासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे महादेव शंकर बनसोडे सारखे असे अनेक वृद्ध महिला, पुरुष, विधवा निराधार महिला दररोज तहसिल कार्यालयाला चकरा मारताना दिसत आहे. रोजच संबधित कार्यालयात असा गरजू लाभार्थींची गर्दी पहावयास मिळते.

तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कडे लक्ष देवून संबधित कर्मचाऱ्यांच्या काम काजात योग्य ती सुधारणा करावी वेळेच्या वेळी लाभार्थ्यांना मंजुरी आदेश द्यावेत त्यांच्याकडून वेळच्यावेळी त्रुटीची पूर्तता करून घ्यावी त्यासाठी नेमलेल्या

कर्मचाऱ्यांचे कर्तव्य बजावण्यासाठीची नोटीस काढावी जेणेकरून असे अनेक महादेव बनसोडे सारखे वृद्ध विधवा निराधार महिल या योजनेच्या मानधना- पासून वंचित राहू नये, त्याना अधिकच्या चकरा मारण्याची वेळ त्यांच्यावर येऊ नये याकरिता ठोस उपाय योजना शासनाने करावी असी मागणी नागरिकातून होत आहे.

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयोजित समस्या-आधारित शिक्षणावरील प्रादेशिक संशोधन परिषदेचे उद्घाटन

शिक्षण हे केवळ उद्योगांशीच नव्हे, तर समाजाच्या प्रश्नांशीही जोडले गेले पाहिजे : चंद्रकांत दादा पाटील

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : 'राज्यात दुष्काळ आणि पाणीटंचाईची परिस्थिती अत्यंत गंभीर असून, त्यावर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी शिक्षण संस्था, स्थानिक प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. प्रकल्प-सम स्या आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समाजात जाऊन समस्या समजून घेत उपाय शोधण्यास प्रोत्साहित करते. आपले शिक्षण हे केवळ उद्योगांशीच नव्हे, तर समाजाच्या प्रत्यक्ष प्रश्नांशी जोडले गेले पाहिजे,' असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयसर पुणे येथे आयोजित 'उच्च शिक्षणातील सम स्या-आधारित शिक्षण' या विषयावरील प्रादेशिक संशोधन परिसंवादाच्या



उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि उद्य- ोग क्षेत्रातील समन्वय वाढविण्याच्या उद्देशाने सोलापूर येथील चौथ्या 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन प्रोजेक्ट अँड प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंग' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन एम आयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ ाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे होत्या. आयआयटी रोपरचे संचालक प्रा. राजीव आहुजा विशेष अतिथि म्हणून उप- स्थित होते. डेन्म ार्कमधील अलबोर्ग विद्यापीठाच्या युनेस्को पीबीएल सेंटरच्या संचालिका प्रा. क्झियानग्यून डू, विद्यापीठाचे संस्थापक-कुलगुरू डॉ. गोपाळकृष्ण जोशी आणि आयसरचे संचालक प्रा. सुनील भागवत याप्रसंगी उपस्थित होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करताना इंटर्नशिप, प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण आणि अप्रेंटिसशिपचा पदवी अभ्यासक्रमात समावेश करावा. तसेच समस्याधारित शिक्षणातून विद्यार्थ्यांना वास्तविक समस्यांवर उपाय शोधण्याची संधी द्यावी.

– राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील

चंद्रकांत पाटील म्हणाले, 'राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यावर एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या पुढाकारातून ही महत्त्वाची परिषद होत आहे. सम स्या-आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील समस्यांचा शोध घेण्यास, एकत्र काम करण्यास आणि ज्ञानाचा व्यावहारिक वापर करण्यास प्रवृत्त करते. यातून रोजगार आणि सुज- ाण नागरिकत्वासाठी आवश्यक अस- लेले चिकित्सक विचार, सर्जनशीलता, संवादकौशल्य आणि सांघिक वृत्ती हे गुण विकसित होतात. ही कौशल्ये रोजगाराबरोबरच जबाबदार नागरिक घडविण्यासाठीही आवश्यक आहेत.

प्रा. स्वाती कराड चाटे यांनी समस्या-आधारित शिक्षणाचा शालेय स्तरा- वरही व्यापक अवलंब करण्याची गरज व्यक्त केली. 'उच्च शिक्षणात येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत ज्ञानासोबतच संवादकौशल्यांची कमतरता जाणवते. विद्यार्थ्यांनी समाजातील समस्या आ- ेळखून त्यावर चर्चा करावी आणि सामूहिकरीत्या उपाय शोधावेत. यातून त्यांचा आत्मविश्वास आणि संवादकौशल्य विकसित होण्यास मदत होईल,' असे त्या म्हणाल्या.

प्रा. राजीव आहुजा यांनी शिक्षणा- चा दर्जा उंचावण्यासाठी शाळांमध्ये प्रशिक्षित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षकांची गरज व्यक्त केली. 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात शिक्षकांनी अध्यापनात नावीन्य आणून विद्यार्थ्यांना वर्गाकडे आकर्षित केले पाहिजे. इंटरनेटवर सहज उपलब्ध नसलेले ज्ञान, अनुभव आणि मार्गदर्शन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावे,' असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. क्झियानग्यून डू यांनी सम स्या-आधारित शिक्षण ही विविध ज्ञानशाखांना जोडणारी आणि सम ाजात अर्थपूर्ण बदल घडविणारी कार्यपद्धती असल्याचे सांगितले. डॉ. गोपाळकृष्ण जोशी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. कृष्णकेदार गुमास्ते यांनी उपस्थितांचे स्वागत केले, प्रा. रूपाली धामणे यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक डॉ. प्रभा कासलीवाल यांनी आभार मानले.